# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230

क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 342 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 08/01/26

प्रति,

उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे नोव्हेंबर 2025 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 63 मधील प्रशिक्षणार्थींचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले कॅम्पा योजना व राज्य योजने अंतर्गत वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल यांचे 03 व 05 दिवसीय अल्प मुदत प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/11/2025 ते 30/11/2025 पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 34 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 01/10/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 63 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **कॅम्पा योजने** व **राज्य योजने** अंतर्गत **वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल** यांचे 03 **दिवसीय व 05 दिवसीय अल्प मुदत** प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 11/11/2025 ते 28/11/2025) या कालावधीमध्ये **एकुण 06 सत्रांमध्ये** आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/11/2025 **ते** 30/11/2025 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक 01/11/2025 **ते** 30/11/2025 या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 ) | 3 ते 6 |
| 02 | M-STrIPES हाताळणी बाबत प्रशिक्षण. ( दि. 01/11/2025 ) | 7 ते 8 |
| 03 | पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती. ( दि. 14/11/2025 ) | 9 |
| 04 | भगवान बिरसा मुंडा यांची जयंती ( दि. 15/11/2025 ) | 10 ते 11 |
| 05 | संविधान दिवस ( दि. 26/11/2025 ) | 12 |
| 06 | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे राज्य योजना व कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 03 व 05 दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ( माहे नोव्हेंबर 2025 ) | 13 ते 22 |
| 07 | वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे. ( माहे नोव्हेंबर 2025 ) | 23 |
| 08 | वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. ( माहे नोव्हेंबर 2025 ) | 24 ते 28 |
| 09 | वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. | 29 ते 31 |
| 10 | माहे नोव्हेंबर 2025 मधील एकुण 06 सत्रातील अल्प मुदत प्रशिक्षणार्थी यांचा व्यायाम व योगा. | 32 ते 34 |
| | | |

01. नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 )









**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि. 01/10/2025** पासुन नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र. 63** यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणाला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रथम सत्र अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| **सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 (कालावधी दि. 01/10/2025 ते 29/03/2026)** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनस्पतीशास्त्र** | डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश:** वनस्पतींच्या रचनेचा, वाढीचा, वर्गीकरणाचा आणि त्यांच्या पर्यावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.<br>**मुख्य घटक:**<br>वनस्पतींची रचना (मूळ, खोड, पाने, फुले, बीज).<br>प्रकाशसंश्लेषण, श्वसन, पोषण प्रक्रिया.<br>वनस्पतींचे वर्गीकरण , वृक्ष, झुडपे, गवत इ.<br>वृक्षांची ओळख (Tree Identification) आणि स्थानिक जातींचे महत्त्व.<br>बीज संकलन, अंकुरण, रोपवाटिका व्यवस्थापन. |
| 03 | **वनसंवर्धन शास्त्र (भाग-01)** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन वृक्षांचे संवर्धन, वाढ, आणि पुनरुत्पादन यांचा अभ्यास.<br>**मुख्य घटक:**<br>वन संवर्धन परिचय, वृक्षांची वृध्दी, वनांच्या वाढीवर परिणाम करणारे घटक, वनस्पतींचे अनुक्रमण, राज्यातील महत्वाचे वनांचे प्रकार, वृक्षांचे वर्गीकरण, जोपासना, विरळणी. |
| 04 | **वृक्षांचे वनसंवर्धन शास्त्र (भाग-02)** | श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा. | **उद्देश:** आर्थिक मूल्याच्या प्रजातींचे उत्पादन वाढवणे, प्रति युनिट वन उत्पादन वाढवणे, दर्जेदार लाकडाचे उत्पादन घेणे, दोन कापणीचे चक्रातील वर्षे कमी करणे, रिकाम्या भागात मानवनिर्मित जंगलांची निर्मीती करणे, मानवनिर्मित रोपवनांची निर्मिती करणे, विदेशी प्रजातीची वनामध्ये लागवड करणे.<br>**मुख्य घटक:**<br>सिल्विकल्चर वर्ण / गुणधर्म, निवडक वन वृक्ष प्रजातींचे वनसंवर्धन, नवीन वन निर्मिती आणि कापणीच्या पध्दती, निम्न वन प्रणाली. |
| 05 | **जैव विविधता व्यवस्थापन** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** पृथ्वीवरील विविध जीवसृष्टीचे संरक्षण व संतुलन राखणे.<br>**मुख्य घटक:** जैवविविधतेची संकल्पना आणि स्तर, आनुवंशिक, प्रजातीगत, परिसंस्थात्मक.<br>**जैवविविधतेचे महत्त्व:** पर्यावरणीय, आर्थिक, औषधी, सांस्कृतिक. स्थानिक व लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन.<br>**संरक्षित क्षेत्रे** - राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, राखीव क्षेत्रे. |
| 06 | **जल व मृद संधारण** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता, रा.परतवाडा. | **उद्देश:** पाणी आणि मातीचे संवर्धन करून वन व कृषी उत्पादन टिकवून ठेवणे.<br>**व्याख्या** : उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन करणे. |
| 07 | **वनकायदे** | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. (से.नि.) | **उद्देश:** वनसंरक्षण, वनव्यवस्थापन व वनातील गुन्ह्यांचे नियंत्रण यासाठी कायदे समजणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य घटक:** भारतीय वन अधिनियम, 1927 (Indian Forest Act).<br>वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 (Wildlife Protection Act).<br>वनसंवर्धन अधिनियम, 1980 (Forest Conservation Act).<br>अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वनवासी (अधिकार मान्यता) अधिनियम, 2006 (FRA).<br>वनगुन्हे ओळखणे, पंचनामा, जप्ती, न्यायालयीन कार्यवाहीची मूलभूत माहिती. |
| 08 | **वन अभियांत्रिकी** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वनसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनासाठी अभियांत्रिकी तत्वांचा वापर करणे. वनउत्पादनांची सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : वन रस्ते, पूल, जलसंधारण रचना उभारणी, मृद व जलसंरक्षण अभियांत्रिकी, लाकूड उत्खनन व वाहतूक तंत्र,यांत्रिक साधनांचा वापर व देखभाल |
| 09 | **व्यवस्थापकीय कौशल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनक्षेत्रातील कामकाज प्रभावी, समन्वित व नियोजित रीतीने पार पाडणे. कार्यसंघ अधिक सक्षम व परिणामकारक बनवणे.<br>**मुख्य घटक**: नियोजन, संघटन, मार्गदर्शन व नियंत्रण नेतृत्व, निर्णयक्षमता व समस्या निराकरण मनुष्यबळ व्यवस्थापन व संवादकौशल्य. |
| 10 | **कुरण विकास व्यवस्थापन** | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश** : पशुधन व वन्यजीवांसाठी शाश्वत चारापूरवठा उपलब्ध करणे. कुरणांची माती, पाणी व जैवविविधता सुधारणा करणे.<br>**मुख्य घटक**: कुरणांचे सर्वेक्षण, मृद व हवामान मूल्यांकन गवत लागवड, सुधारणा व व्यवस्थापन चाराप्रकार, वन्यजीवांसाठी चराईक्षेत्र विकास. |
| 11 | **वन्यजीव व्यवस्थापन** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवणे. जैवविविधता संतुलित ठेवणे.<br>**मुख्य घटक**: अधिवास संरक्षण, परिसंस्था संवर्धनवन्यजीव गणना, निरीक्षण व संशोधनमानव-वन्यजीव संघर्ष नियंत्रणसंरक्षित क्षेत्रांचे नियोजन. |
| 12 | **वनमिती** | श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : जंगलातील लाकूडसंपत्तीचे अचूक मूल्यांकन करणे. कार्ययोजना व वनसंपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करणे.<br>**मुख्य घटक**: वृक्ष मापन पद्धती (उंची, व्यास, घनफळ) वनक्षेत्र सर्वेक्षण तंत्रनमुना सर्वेक्षण व डेटा विश्लेषण. |
| 13 | **मृदशास्त्र** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : खडक व माती, पृथ्वीचे आवरण, अग्निजन्य, जलयजन्य व रुपांतरित खडक व त्यांचे विविध प्रकार, खडक व खनिजांचे विघटन.<br>**मुख्य घटक**: मातीची उत्पत्ती, रचना, गुणधर्ममृद प्रकार, सुपीकता, पोषकतत्त्वेमृद अपरदन व जलसंरक्षण तत्त्वे, भौतिक व रासायनिक जैविक कारके व प्रक्रिया, जमिनीचा पोत व जमिनीची घडण, आम्ल-विम्ल निर्देशांक, महत्वाचे मातीचे प्रकार व गुणधर्म. |
| 14 | **भुमि अभिलेख** | श्री. हेमंत शेवाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, पाल. | **उद्देश** : वनक्षेत्राची स्पष्ट, संगणकीकृत व अचूक नोंद राखणे. सीमावाद टाळणे व जमीन व्यवस्थापन सुलभ करणे.<br>**मुख्य घटक**: नकाशे, भू-मापन, सातबारा व इतर अभिलेखभू-सीमा निर्धारण, दुरुस्ती व डिजिटल नोंद GIS, GPS वापर. |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | **पुनरुत्पादन पध्दती ( वनसंवर्धन शास्त्र भाग-3)** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश**: जंगलांचा सातत्यपूर्ण वाढीचा वेग टिकवून ठेवणे. हरितक्षेत्र वाढवणे व लाकूडसंपत्तीची स्थिर उपलब्धता सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक**: प्राकृतिक पुनरुत्पादन (बी उगवण, अंकुरोत्पादन) कृत्रिम पुनरुत्पादन (लागवड, बियाणे पेरणी, रोपवाटिका) कापणी पद्धती, पुनरुत्पादन निरीक्षण, वनांची पुनरुत्पती, नैसर्गिक पुनरुत्पत्ती, मियावाकी वृक्षारोपन पध्दती. |






वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत. या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते.

## 02. M-STrIPES **हाताळणी प्रशिक्षण** ( दि. 01/11/2025 )



दिनांक 01/11/2025 रोजी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांच्या मार्फत **M-STrIPES** हाताळणी विषयक विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. वन्यजीव संरक्षण व गस्त व्यवस्थापनामध्ये **M-STrIPES** हा महत्वाचा तांत्रिक घटक असल्याने हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरले.

**प्रशिक्षणाचे उद्दिष्टे**:

1. वन्यजीव संरक्षणामध्ये **M-STrIPES** चा कार्यक्षम व सुरक्षित वापर शिकविणे.
2. क्षेत्रातील वनकर्मचारी व अधिकाऱ्यांची तांत्रिक क्षमता वाढवणे.
3. संयुक्त विभागांमध्ये समन्वय, अनुभव देवाणघेवाण आणि कार्यपध्दतींचे एकरुपीकरण घडविणे.
4. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रातील आधुनिक साधनांची ओळख करुन देणे.

**प्रशिक्षणातील सहभागी**:

- गुगामल वन्यजीव विभागांतील **वन कर्मचारी व अधिकारी** मोठया संखेने उपस्थित होते.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील वनरक्षक सत्र क्र. 63 मधील सर्व प्रशिक्षणार्थी सहभागी होते.

**कार्यपध्दती व प्रशिक्षणाचे स्वरूप**:

1. M-STrIPES **प्रणालीची ओळख**: यंत्रणेचे तांत्रिक घटक, कार्यपध्दती, वापराचे नियम यांचे सादरीकरण.
2. **प्रात्यक्षिक सत्र**: M-STrIPES चा वापर करुन गस्त, नोंदवही, डेटा गोळा करणे, तसेच क्षेत्रातील आपात्कालीन परिस्थितींमध्ये त्याचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन.
3. **कौशल्यविकास**: सहभागींकडून M-STrIPES प्रत्यक्ष हाताळणी करुन घेण्यात आली.
4. **प्रश्नोत्तर सत्र**: सहभागींच्या शंकांचे निरसन करुन संबंधित सूचनांची देवाणघेवाण.

**निरीक्षणे**:

- वनकर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी दोघांनीही M-STrIPES चा उपयोग सहजपणे आत्मसात केल्याचे दिसून आले.
- विभागांमधील संयुक्त प्रशिक्षणामुळे कामकाजात समन्वय वाढण्यास मदत होईल.
- सहभागींच्या प्रतिसादावरुन प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त, व्यावहारीक आणि अद्ययावत असल्याचे स्पष्ट झाले.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वन्यजीव व्यवस्थापनात कसा प्रभावी उपयोग होऊ शकतो याची सहभागींकडे ठोस समज निर्माण झाली.

**निष्कर्ष**:

गुगामल वन्यजीव विभाग यांच्या मार्फत आयोजित M-STrIPES हाताळणी प्रशिक्षण अत्यंत यशस्वी ठरले. अधिकारी, वनकर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी यांनी तांत्रिक साधनांच्या वापराबाबत आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास प्राप्त केला. क्षेत्रातील गस्त कार्य, आपत्ती व्यवस्थापन आणि वन्यजीव संरक्षणातील अचूक डेटा संकलन या सर्व बाबींमध्ये M-STrIPES चा प्रभावी उपयोग कसा करता येतो हे स्पष्ट झाले. अशा प्रकारचे संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम भविष्यातही सातत्याने आयोजित केल्यास वन विभागाच्या कार्यक्षमतेत आणि समन्वयात लक्षणीय वाढ होईल.

03. **पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती**. ( दि. 14/11/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 14/11/2025 रोजी **पंडीत जवाहरलाल नेहरु** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. व तसेच वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांनी सुध्दा **पंडीत जवाहरलाल नेहरु** यांची जयंती साजरी केली.

पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान, थोर स्वातंत्र्यसैनिक व दूरदृष्टी असलेले नेते होते. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर १९४७ ते १९६४ या काळात त्यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून कार्य केले.

नेहरूजींनी आधुनिक भारताच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, औद्योगिक विकास, शिक्षण व्यवस्था तसेच लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला. आयआयटी, इस्रोसारख्या संस्थांच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा आहे.

पंडित नेहरू यांना बालकांविषयी विशेष प्रेम होते, म्हणूनच त्यांची जयंती *बालदिन* म्हणून साजरी केली जाते. त्यांच्या विचारांनी आजही युवकांना राष्ट्रसेवेसाठी प्रेरणा दिली आहे.

## 04. **भगवान बिरसा मुंडा यांची जयंती** ( **दि**. 15/11/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 15/11/2025 रोजी **भगवान बिरसा मुंडा** यांची जयंती **संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. व तसेच वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांनी सुध्दा **भगवान बिरसा मुंडा** यांची जयंती साजरी केली व या सोबतच वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांनी **भगवान बिरसा मुंडा** यांची जयंती निमीत्त एका सांस्कृतीक कार्यक्रमाचे देखील आयोजन केले.

भगवान बिरसा मुंडा जयंती ही केवळ एका महान क्रांतिकारकाच्या स्मरणार्थ साजरी होणारी तारीख नसून, आदिवासी समाजाच्या स्वाभिमान, हक्क आणि संघर्षाचे प्रतीक आहे. बिरसा मुंडा यांनी अल्पायुष्यातच अन्याय, शोषण आणि परकीय सत्तेविरुद्ध लढा उभारून समाजात जागृती निर्माण केली. ब्रिटिश राजवटीतील अन्यायकारक व्यवस्था, जमीनदारी पद्धती आणि आदिवासींच्या हक्कांवरील अतिक्रमण याविरुद्ध त्यांनी ठाम भूमिका घेतली.

त्यांचा “उलगुलान” हा उठाव सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिवर्तनाची चळवळ ठरला. त्यांनी आदिवासी समाजाला एकत्र येण्याचा, आत्मसन्मान जपण्याचा आणि आपल्या हक्कांसाठी उभे राहण्याचा संदेश दिला. बिरसा मुंडा यांनी केवळ शस्त्रांच्या बळावर नव्हे, तर विचारांच्या शक्तीने परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न केला.

आजच्या काळात बिरसा मुंडा यांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. सामाजिक समता, न्याय, पर्यावरण संवर्धन आणि सांस्कृतिक ओळख जपण्याची शिकवण त्यांच्या कार्यातून मिळते. भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे, आदिवासी समाजाच्या विकासासाठी संवेदनशील राहणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमीत्त सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन.









## 05. संविधान दिवस ( दि. 26/11/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 26/11/2025 रोजी **संविधान दिवस संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. व तसेच वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांनी सुध्दा **संविधान दिवस** साजरा केला.

संविधान दिवस दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतात साजरा केला जातो. या दिवशी १९४९ साली भारताच्या संविधानाला औपचारिक मान्यता देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील संविधान सभेने अथक परिश्रम, सखोल अभ्यास आणि व्यापक विचारमंथनातून भारतीय संविधानाची निर्मिती केली. संविधान दिवस साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणे होय.

भारतीय संविधान हे जगातील सर्वांत व्यापक आणि सविस्तर लिखित संविधान मानले जाते. या संविधानाने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून ओळख दिली. संविधानामध्ये मूलभूत हक्क, राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांचा समतोल साधण्यात आला आहे. यामुळे नागरिकांचे हक्क सुरक्षित राहतात तसेच त्यांच्यावर समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीवही निर्माण होते.

संविधानाने दिलेले अधिकार हे केवळ उपभोगण्यासाठी नसून त्यांचा योग्य आणि जबाबदारीने वापर करण्यासाठी आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानतेचा हक्क आणि शिक्षणाचा अधिकार यांचा उपयोग समाजहितासाठी झाला, तरच लोकशाही अधिक मजबूत होते. संविधानाच्या मूल्यांची अंमलबजावणी केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. दैनंदिन जीवनात सत्य, न्याय, सहिष्णुता आणि बंधुभाव जोपासल्यास संविधानाचा आत्मा जिवंत राहील. त्यामुळे संविधान दिवस हा आत्मपरीक्षणाचा आणि राष्ट्रहितासाठी कटिबद्ध होण्याचा प्रेरणादायी दिवस ठरतो.

## 06. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे राज्य योजना व कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 03 व 05 दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ( माहे नोव्हेंबर 2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 01 दि. 11/11/25 ते 15/11/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनरक्षक** | **विषय: उजळणी प्रशिक्षण. ( वनरक्षक )** | | 15 |
| | | | 01. व्यक्तीमत्व विकास.<br>02. ताणतणाव व्यवस्थापन व NLP. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 03. वनविभागातील ईमारतींचे बांधकाम ( अंदाजपत्रक, M.B. ई.)<br>04. वन विभागातील जल व मृद संधारण कामे ( जागेची निवड, अंदाजपत्रक, M.B.) | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | |
| | | | 05. वन्यप्राणी अस्तित्व व पुरावे.<br>06. औषधी वनस्पती, दुर्मिळ वनस्पती व रानभाज्या.<br>07. संस्थेतील वनस्पतींची ओळख.<br>08. वैराट ट्रेकिंग. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |
| | | | 09. आगार व्यवस्थापन ( नगांचे मोजमाप, घनफळ मोजणी व इतर मोजनी ) | श्री. एस.एस. बिजागरे, लिपीक से.नि. | |
| | | | 10. महाराष्ट्र वनसंहिता 2021, वनगुन्हे हाताळण्या बाबतची कार्यपध्दती.<br>11. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>12. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>13. अ. जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>14. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023. | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 15. म.ना.से. (शिस्त व अपील ) 1979 पदग्रहण अवधी, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती.<br>16. म.ना.से. (रजा) नियम 1981, सेवापुस्तक, शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ. | श्री. विजय डहाळे, सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 17. POSH 2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| 02 | **सत्र क्र. 17 दि. 12/11/25 ते 14/11/25** | **राज्य योजना अंतर्गत वनरक्षक / वनपाल** | **विषय: Fire Management.**<br>1. भारतातील वन-वणवा व्यवस्थापन प्रणाली वर्तमान परिस्थिती.<br>2. Forest Fire Danger Rating and FSI Fire Alert System.<br>3. वन-वणवा व्यवस्थापना वरील सर्वोत्तम पध्दती. ( न्यायालयीन प्रकरणे )<br>4. वन-वणव्याचे धोके आणि सुरक्षा उपाय योजना.<br>5. पारंपारिक वन-वणवा नियंत्रण तंत्र.<br>6. चर्चा व शंकानिरसन. | श्री. रविंद्र खेरडे, व.प.अधिकारी, चौराकुंड. | 32 |
| 03 | **सत्र क्र. 02 दि. 18/11/25 ते 22/11/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनरक्षक** | **विषय: उजळणी प्रशिक्षण. ( वनरक्षक )**<br>01. व्यक्तीमत्व विकास.<br>02. ताणतणाव व्यवस्थापन व NLP. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | 30 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 03. वन विभागातील जल व मृद संधारण कामे<br>( जागेची निवड, अंदाजपत्रक, M.B.) | श्री. अनिल लोखंडे,<br>खाजगी अभियंता.<br>रा. परतवाडा. | |
| | | | 04. आगार व्यवस्थापन ( नगांचे मोजमाप, घनफळ मोजणी व इतर मोजनी ) | श्री. एस.एस. बिजागरे,<br>लिपीक से.नि. | |
| | | | 05. महाराष्ट्र वनसंहिता 2021, वनगुन्हे हाताळण्या बाबतची कार्यपध्दती.<br>06. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>07. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>08. अ. जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>09. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023. | श्री. एस.एम. जगताप,<br>वि.व.अ. से. नि. | |
| | | | 10. म.ना.से. (शिस्त व अपील ) 1979 पदग्रहण अवधी, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती.<br>11. म.ना.से. (रजा) नियम 1981, सेवापुस्तक, शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ. | श्री. विजय डहाळे,<br>सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 12. POSH 2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक,<br>वन प्रशिक्षण संस्था,<br>चिखलदरा. | |
| | | | 13. वनविभागातील ईमारतींचे बांधकाम<br>( अंदाजपत्रक, M.B. ई.)<br>14. वन्यजीव व्यवस्थापन. | श्री. एस.एम. सुरजुसे,<br>सवस. से.नि. | |
| | | | 15. रोपवन व रोपवाटीका. | श्री. एस.एन. गुल्हाने,<br>सवस. से.नि. | |
| | | | 16. कुरण विकास व्यवस्थापन. | प्रा.जी.डी. मुरतकर,<br>सिपना कॉलेज,<br>चिखलदरा. | |
| | | | 17. ट्रेकिंग / क्षेत्रिय दौरा. | श्री. आर. जी. मुन,<br>वनपरिक्षेत्र अधिकारी,<br>वन प्रशिक्षण संस्था,<br>चिखलदरा. | |
| **04** | **सत्र क्र. 18<br>दि. 19/11/25<br>ते 21/11/25** | **राज्य योजना अंतर्गत लिपिक / लेखापाल वनरक्षक / वनपाल** | **विषय: आगार व्यवस्थापन.**<br>1. कार्टींग चलान, ईमारती मालाची आवक, आवक रजिष्टर.<br>2. ग्रेडींग नियम, गट लावणे.<br>3. लॉट रजिष्टर, लॉट लिस्ट व ईतर.<br>4. ईमारती मालाच्या निर्धारीत किंमती ( Upset Price ) निश्चित करण्या करीता सरासरी दर तयार करणे.<br>5. ईमारती मालाच्या निर्धारीत किंमती ( Upset Price ) निश्चित करणे.<br>6. शासकिय लाकुड आगार, परतवाडा येथे भेट देऊन ईमाररती मालाचे मोजमाप ग्रेडींग / निर्गत व इतर बाबी अभ्यासणे.<br>7. शासकिय लाकुड आगार, परतवाडा आगार स्तरावरील अभिलेख पाहणी.<br>8. ईमारती मालाच्या लिलावाची कार्यपध्दती.<br>9. इमारती माल निर्गतीची कारवाई.<br>10. चर्चा व शंकानिरसन. | श्री. एस.एस. बिजागरे,<br>लिपीक, से.नि.<br>रा. परतवाडा. | **24** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 05 | **सत्र क्र. 03 दि. 24/11/25 ते 28/11/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनरक्षक** | **विषय: उजळणी प्रशिक्षण. ( वनरक्षक )** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | 29 |
| | | | 01. वन विभागातील जल व मृद संधारण कामे ( जागेची निवड, अंदाजपत्रक M.B.) | | |
| | | | 02. व्यक्तीमत्व विकास. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 03. औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती.<br>04. औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती प्रात्यक्षिक संस्थेच्या परिसरात क्षेत्रीय दौरा. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |
| | | | 05. POSH 2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 06. वनविभागातील ईमारतीचे बांधकाम ( अंदाजपत्रक M.B. ई. )<br>07. वन्यजीव व्यवस्थापन. | श्री. एस.एम. सुरजुसे, सवस. से.नि. | |
| | | | 08. म.ना.से. ( रजा ) नियम 1981, सेवापुस्तक शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे लाभ.<br>09. म.ना.से. ( शिस्त व अपील ) 1979 पदग्रहण अवधी, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती. | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखा अधिकारी, रा. अमरावती. | |
| | | | 10. कुरण विकास व्यवस्थापन. | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | |
| | | | 11. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>12. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>13. अ.जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>14. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023. | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 15. ट्रेकिंग / क्षेत्रिय दौरा. | श्री. एस.एम. सुरजुसे, सवस. से.नि.<br>श्री. एस.आर. भिसे, सहा. अभिरक्षक, व.प्र.सं.चिखलदरा. | |
| 06 | **सत्र क्र. 01 दि. 24/11/25 ते 28/11/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल** | **विषय: उजळणी प्रशिक्षण ( वनपाल )** | | 31 |
| | | | 01. औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती ओळख.<br>02. रानभाज्या ओळख.<br>03. संस्थेच्या परिसरातील वनस्पतीची ओळख व क्षेत्रिय दौरा.<br>04. वन्यजीव व्यवस्थापन.<br>05. वन्यप्राणी अस्तित्व व पुरावे. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |
| | | | 06. वन विभागातील जल व मृद संधारण कामे ( जागेची निवड, अंदाजपत्रक M.B.)<br>07. वनविभागातील ईमारतीचे बांधकाम ( अंदाजपत्रक M.B. ई. ) | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | |
| | | | 08. POSH 2013 | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 09. म.ना.से. ( रजा ) नियम 1981, शासकीय लाभ. शिस्त व अपील 1979 पदग्रहण अवधी, | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखा अधिकारी, रा. अमरावती. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 10. आगार व्यवस्थापन. | (श्री. एस.एस. बिजागरे, लिपीक, से.नि. रा. परतवाडा.) | |
| | | | 11. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>12. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>13. अ.जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>14. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023. | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 15. ट्रेकिंग / क्षेत्रिय दौरा. | श्री. एस.एम. सुरजुसे, सवस. से.नि.<br>श्री. एस.आर. भिसे, सहा. अभिरक्षक, व.प्र.सं.चिखलदरा. | |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी** | | | | 161 |

**वनरक्षक यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र.** 01 ( **दि.** 11/11/2025 **ते** 15/11/2025 )

**विषय: उजळणी प्रशिक्षण.**









वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक / वनपाल प्रशिक्षण  सत्र क्र.** 17 ( **दि.** 12/11/2025 **ते** 14/11/2025 )

**विषय:** Fire Management









प्रशिक्षणार्थीचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थीचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थीचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.










प्रशिक्षणार्थींचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र.** 02 ( **दि.** 18/11/2025 **ते** 22/11/2025 )
**विषय: उजळणी प्रशिक्षण.**










वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र. 03 ( दि. 24/11/2025 ते 28/11/2025 )**
**विषय: उजळणी प्रशिक्षण.**










वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनपाल यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र. 01 ( दि. 24/11/2025 ते 28/11/2025 )**
**विषय: उजळणी प्रशिक्षण.**









वनपाल प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

07. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे.

( संस्थेच्या परीसरातील झाडांना आळे करणे दि. 08/11/2025 )







## 08. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.













नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 6 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीना विविध व्यायामाचे प्रकार शिकवण्यात येतात. यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उत्साह, आत्मविश्वास, संघ भावना तसेच सहकार्य वाढल्याचे प्रकर्षाने जाणवले.

सदर प्रशिक्षणार्थीना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा आणि नितीन बघाये, कत्रांटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ





नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 6 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींचे संध्याकाळच्या खेळ सेशन मध्ये प्रशिक्षणार्थींची रनिंग नियमीतपणे घेण्यात येते. कधी कधी प्रशिक्षणार्थींचा महत्वपूर्ण आणि शारीरिक तसेच मानसिक तयारी तपासणारा Carry the Person हा (Recreational) गेम घेण्यात येतात. या गेममध्ये 5 जणांची टीम बनवुन एका जणाला जणु काही तो injured आहे अस समजुन आणि हाताला व पायाला धरुन उचलून घेऊन नेण्यात येते. Injury झालेल्या व्यक्तींला योग्य पध्दतीने कस हलवावं, संवेदनशीलता कशी दाखवावी आणि सर्वात महत्वाचं म्हणजे योग्य टीमवर्क म्हणजे नेमक काय हे समजते.

## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.





**09. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा.**

**( विषय: कुरण विकास व्यवस्थापन, व्याख्याते प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा.)**





**रोपवन -बेस लाईन व ग्रीड लाईन टाकणे, उपचार, नकाशा तयार करणे इ.**

**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा.**

**( विषय: जल व मृद संधारण, व्याख्याते श्री. अलील लोखंडे, खाजगी अभियंता )**





**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा.**

**( विषय: वन अभियांत्रीकी, व्याख्याते श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक, से.नि.)**





10. माहे नोव्हेंबर 2025 मधील एकुण 06 सत्रातील अल्प मुदत प्रशिक्षणार्थी यांचा व्यायाम व योगा.







**माहे नोव्हेंबर 2025 मधील एकुण 06 सत्रामधील अल्प मुदत प्रशिक्षणार्थी यांचा व्यायाम व योगा.**





अल्प मुदत प्रशिक्षणार्थींसाठी योग, प्राणायाम आणि NLP (न्यूरो-लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग) च्या तासिका घेतल्यामुळे होणारे दोन मुख्य फायदे खालीलप्रमाणे आहेत.

01. मानसिक स्पष्टता आणि एकाग्रता: प्रशिक्षणार्थींचा ताण कमी होऊन त्यांची एकाग्रता वाढते, ज्यामुळे ते नवीन कौशल्ये अधिक वेगाने आणि कार्यक्षमतेने आत्मसात करु शकतात.

02. आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व विकास: NLP आणि योगामुळे विचारांमध्ये सकारात्मकता येते आणि संवाद कौशल्य सुधारते, परिणामी प्रशिक्षणार्थींचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या व्यावसायिक कामगिरीत मोठी सुधारणा होते.

**माहे नोव्हेंबर 2025 मधील एकुण 06 सत्रामधील अल्प मुदत प्रशिक्षणार्थी यांचा व्यायाम व योगा.**








सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व  नितीन बघाये, कत्रांटी सहा. कवायत शिक्षक,  वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.